Website: www.word-pdf-convert.com

# के.एम.कामुने, अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे न्यायालय

अ.प्र.क्र. आरटीएस-६४/येळगांव/०९/२००९-१०

श्री. संजय पुरणचंद पंजाबी
रा. ता. चिखली जि. बुलडाणा - - अपिलार्थी

विरुध्द

१) श्री. पुरणचंद रामचंद पंजाबी
२) श्री.ओमप्रकाश पुरमणचंद पंजाबी
३) श्री.दिपक पुरणचंद पंजाबी
४) सौ.निलिमा पुरणचंद पंजाबी
सर्व रा.हाजीमलंग दर्गा जवळ
चिखली रोड बुलडाणा ता. जि. बुलडाणा -
प्रतिवादी

## आदेश

( पारित दिनांक ७ ऑगस्ट, २०१० )

प्रतिवादी श्री. पुरणचंद रामचंद पंजाबी यांनी त्यांच्या मालकीच्या मौजे येळगांव ता.जि. बुलडाणा येथील गट क्र. ४४२ मधील ६.८९ हे.आर. जमीनीपैकी १.७६ हे.आर.जमीन त्यांचे वारस प्रतिवादी क्र.२,३,४ आणि अपिलार्थी यांना वाटणी करुन दिली आहे. त्या संबधाने घेण्यात आलेला फेरफार क्र. १५२३ दिनांक ४.५.२००० रोजी रुजु झालेला आहे. वारसावर प्रतिवादी क्र.१ चा विश्वास न राहिल्याने व वाटणीपत्र पंजीकृत नसल्याने ते रद्द करण्याबाबत व फेरफार सुध्दा रद्द करण्याबाबत श्री. पुरणचंद रामचंद पंजाबी यांनी उप विभागीय अधिकारी बुलडाणा यांचे कडे अपिल दाखल केले होते. उप विभागीय अधिकारी बुलडाणा, यांनी रा.अ.प्र.क्र. आरटीएस-६४/येळगांव/५३/२००७-०८ मधील दिनांक ३०.८.२००९ अन्वये अपिल मंजुर करण्यात येऊन फेरफार क्र. १५२३ रद्द ठरविलेला आहे.आणि पुर्वीची स्थिती कायम करण्यात आलेली आहे.सदर आदेशामुळे अपिलार्थी यांनी व्यथीत होऊन सदर अपिल दाखल केलेले आहे.

प्रकरण पंजीबध्द करण्यात आले आहे. प्रतिवादीना नोटिस देण्यात आल्या आहे.

अपिलार्थी यांचे वतीने त्यांचे वकिलांनी लेखी युक्तीवाद दाखल केलेला आहे. त्यात त्यांनी नमुद केले आहे की, वादग्रस्त फेरफार नोंदविण्यात आला त्यावेळेस कोणतेही हरकत,आक्षेप घेतलेला नव्हता सदरची वादग्रस्त जमीन प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी व स्वत: अपिलार्थी यांनी अकृषिक करुन घेतलेली आहे. प्रतिवादी क्र. १ व ४ हे पती पत्नी आहे.प्रविवादी क्र.२ व ३ आणि अपिलार्थी मुले असुन हाजीमलंग दर्गाजवळ स्वत:चे मालकीचे घरात राहतात हे घर वादातील जमीनीलगत आहे.संबधीत तलाठी यांना कनिष्ठ कोर्टाने बोलाऊन वाटणी पत्राची शहानिशा करुन घेतली नाही. कौटुंबीक आपसात तडजोडी करीता करण्यात आलेले वाटणी पत्र हे पंजीबध्द असलेच पाहिजे असा कुठेही उल्लेख नाही. सदर वादग्रस्त मालमता वडिलोपार्जीत असल्याने अपिलार्थी हा प्रतिवादी क्र. १ चा कायदेशीर वारस असल्याने सदर मालमत्ते मध्ये अपिलार्थीचा कायदेशीर हक्क आहे. एकमेकावर विश्वास न राहिल्याने फेरफार रद्द करण्यात यावेत या कथनात कायदेशीर मुद्दा नाही. करीता याच मुद्यावर कनिष्ठ न्यायालयाचा आदेश खारीज होणे जरुरी आहे.

Website: www.word-pdf-convert.com

प्रतिवादी क्र.१ यांनी प्रकरणात वकिलामार्फत लेखी युक्तीवाद दाखल केला आहे. तसेच त्यांनी प्रतिवादी क्र.२ ते ४ हयाचे पुरसीस दाखल करुन अपिल खारीज करणे बाबत नमुद केले आहे.लेखी युक्तीवादात त्यांनी नमुद केले आहे की, वादातील जमीनीचे वाटणीपत्र झालेले नव्हते. वाटणीपत्राचे आधारे झालेल्या तथाकथीत फेरफारा बद्दल प्रथम १९.५.२००८ रोजी माहिती मिळाल्या वरुन तो रद्द करणे बाबत अपिल दाखल केले होते. वादातील फेरफाराचे वाटणीपत्र दाखल केलेले नाही. अचल संपत्तीचे हस्तांतरण पंजीबध्द दस्ताने कायद्याने करता येते फेरफार नोंदवीतांना संबधीतांना महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमातंर्गत नोटिस द्याव्या लागतात. त्या दिलेल्या नाहीत. प्रतिवादी यांना सदर जमीन ही मुत्युपत्राद्धारे मिळालेली आहे. त्यामुळे ती वडिलोपार्जीत जमीन ठरत नाही.अपिलार्थी यांनी खोटा दस्त तयार केला आहे. प्रतिवादी क्र.२ ते ३ अपिलार्थीचे भाऊ व प्रतिवादी क्र. ४ आई हयांनी सुध्दा वाटणीपत्र झाले नसल्याचे नमुद केले आहे. रा.प्र.क्र. एनएपी-३४/येळगांव/१९/१९९३-९४ मधील आदेश दिनांक २२.४.१९९४ अन्वये १७ आर. जमीन अकृषिक करुन घर बांधलेले आहे. गट नं. ४४२ मधील जमीन ही वडिलोपार्जीत जमीन असल्याचे ना कबुल आहे. हया सर्व बाबी विचारात घेऊन उप विभागीय अधिकारी बुलडाणा, यांनी आदेश दिनांक ३०.८.२००९ अन्वये फेरफार क्र. १५२३ रद्द ठरविलेला आहे. त्यामुळे अपिलार्थीचे अपिल खर्चासह नामंजुर करण्यात यावे.

उभय पक्षकांराचा लेखी युक्तीवाद,कनिष्ठ कोर्टाचे प्रकरण त्यातील दस्तऐवज व पारित केलेला आदेश हयांचे अवलोकन केल्यावर माझी अशी खात्री झाली आहे की, उप विभागीय अधिकारी बुलडाणा , यांनी पारित केलेला आदेश न्यायोचित आहे.सबब प्रकरणात खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

अपिलार्थीचे अपिल नामंजूर करण्यात येत आहे. उपविभागीय अधिकारी बुलडाणा यांनी प्र.क्र.आरटीएस-६४/येळगांव /५३/२००७-०८ मध्ये दिनांक ३१.८.२००९ रोजी पारीत केलेला आदेश कायम करण्यात येत आहे.

खर्चाबाबत आदेश नाहीत.

(के.एम.कावळे)
अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा

**प्रतिलिपी**

उप विभागीय अधिकारी, बुलडाणा यांना त्यांच्या फाईलवरील प्र.क्र. आरटीएस-६४/येळगांव /५३/ २००७-०८ सह माहिती उचित कार्यवाही करीता अग्रेषित

अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा